


मंगला गाडगीळ

ग्राहक मंच








अंध, मुके/बहिरे, वृद्ध, रुग्ण, भाषा न समजणारे, काही विशिष्ट वैद्यकीय गरज असणारे अशा निरनिराळ्या प्रकारचे दिव्यांग असतात. त्यांना एकाच 'दिव्यांग' गटामध्ये गणले जाते. प्रत्येक दिव्यांगांची गरज वेगळी असते. काही जणांना 'लेग स्पेस' जास्त लागते. त्यांच्यासाठी ती चैन नसून गरज असते, याचा विचार झाला पाहिजे.

# दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांच्या हवाई प्रवासातील समस्या

प्रवास मुळात कटकटीचा. त्यातून प्रवासी ज्येष्ठ नागरिक किंवा दिव्यांग असेल तर त्यांना हाच प्रवास अत्यंत त्रासदायक होतो. कोलंबोहून परत मुंबईला येतानाची ही घटना. ८० वर्षांची आई आणि आर्थ्रायटिसग्रस्त पन्नाशीतील मुलगी दोघींसाठी व्हीलचेअरची नोंदणी तिकिटे बुक करतेवेळीच केली होती. तरी आयत्या वेळेस मात्र एकच व्हीलचेअर उपलब्ध झाली. मुलीला चालताच येत नसल्याने शेवटी म्हाताऱ्या आईला चालत जावे लागले.

आणखी एक उदाहरण द्यायचे झाले तर ८० वर्षांची वृद्धा न्यूयॉर्कहून परत येत होती. व्हीलचेअर उपलब्ध न झाल्याने तिला चालत जावे लागले. विमान कंपनीला व्हीलचेअर मदतीसाठी पूर्व विनंती करूनही त्यांना विमानातून उतरताना व्हीलचेअर देण्यात आली नव्हती. विमानातून टर्मिनलकडे चालत जाताना शारीरिक कष्टांमुळे मुंबई विमानतळावर त्या कोसळल्या आणि त्यांचा मृत्यू झाला.

या पार्श्वभूमीवर पायल सक्सेना हिने भारतीय नागरी विमान वाहतूक/विमानतळ प्राधिकरण (DGCA), एअर इंडिया आणि अदानी एंटरप्राइज लिमिटेड/मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड यांच्याविरुद्ध न्यायालयात याचिका दाखल केली. सुनावणी दरम्यान ज्येष्ठ नागरिकांना विमान प्रवास करताना होणाऱ्या त्रासांबद्दल आणि विशेषतः नागरी विमान वाहतूक कंपन्यांकडून किंवा विमानतळ संचालकांकडून पुरविल्या जाणाऱ्या व्हीलचेअर आणि इतर न्याय्य सुविधा उपलब्ध नसल्याचे गंभीर मुद्दे उपस्थित झाले. ज्येष्ठ नागरिकांच्या या मूलभूत गरजांमध्ये कोणताही हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा होता कामा नये, अशा विशेष गरजा पूर्ण करणे ही निःसंशयपणे सर्व संबंधित घटकांची सामूहिक जबाबदारी आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सक्सेना यांनी तीन सदस्यांची एक समिती स्थापन केली. या समितीत आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश गोडा रघुराम, DGCAचे एक प्रमुख अधिकारी आणि ग्राहक प्रतिनिधी म्हणून मुंबई ग्राहक पंचायतीचे ॲड. शिरीष देशपांडे आहेत.

या संदर्भात ज्येष्ठ किंवा दिव्यांग प्रवाशांच्या मागण्या सर्वसाधारणपणे अशा आहेत- बुकिंगच्या वेळेस व्हीलचेअरची मागणी केली असेल तर ती उपलब्ध झालीच पाहिजे. अशावेळी कोणतीही सबब देता कामा नये. छोट्या एअरपोर्टवर ॲम्ब्युलिफ्ट उपलब्ध असावी. काही प्रवाशांच्या बाबतीत 'बॉडी स्कॅनर्स'चा उपयोग होऊ शकत नाही. दिव्यांग प्रमाणपत्र दाखवल्यानंतर ठिकठिकाणी पुन्हा प्रश्न विचारण्याची गरज नाही. ते अपमानास्पद वाटते.

अंध, मुके/बहिरे, वृद्ध, रुग्ण, भाषा न समजणारे, काही विशिष्ट वैद्यकीय गरज असणारे अशा निरनिराळ्या प्रकारचे दिव्यांग असतात. त्यांना एकाच 'दिव्यांग' गटामध्ये गणले जाते. प्रत्येक दिव्यांगांची गरज वेगळी असते. काही जणांना 'लेग स्पेस' जास्त लागते. त्यांच्यासाठी ती चैन नसून गरज असते, याचा विचार झाला पाहिजे.

काही प्रवासी स्वतःची स्वयंचलित व्हीलचेअर आणतात. तिची किंमत जवळपास ५ लाखांपर्यंत असते. एअरपोर्टच्या आत, विमानात चढताना किंवा कार्गोमध्ये ठेवताना तिचे काही नुकसान झाले तर त्याची जबाबदारी कोणाची, हाही प्रश्न आहेच.

बग्गीचे बुकिंग करण्याचीसुद्धा सोय असावी. प्रवासी दिव्यांग नसला आणि पाय मुरगळलेला असेल तर चालणे कठीण असते. अशा वेळी बग्गी वापरणे गरजेचे असते. तरी मनधरणी करावी लागते, असे होऊ नये.

विमानाकडे किंवा टर्मिनलकडे प्रवाशांना नेणाऱ्या बसमध्ये खूप गर्दी असल्याने सामान सांभाळत उभ्याने प्रवास करावा लागतो. काही वेळेला अचानक ब्रेक लागतो आणि माणसे अक्षरशः एकमेकांवर पडतात. त्याबाबत काळजी घेतली पाहिजे. प्रत्येक बस 'लो फ्लोअर' असलीच पाहिजे.

एका दिव्यांगाने आपले क्रॅचेस डोक्यावरच्या सामान ठेवण्याच्या जागेत सर्वात शेवटी ठेवल्या. जेणे करून उतरताना लगेच हातात येतील. पण इतर प्रवाशांनी घाई केली आणि खाली बसलेल्या प्रवाशाच्या डोक्यावर त्या पडल्या. हे टाळण्याकरिता क्रचेस ठेवण्यासाठी योग्य जागा असावी. केबिन क्रूला त्याची माहिती असावी.

काही प्रवासी व्हीलचेअरचा गैरवापर करताना आढळतात. व्हीलचेअरवर बसून त्यांना शॉपिंग करायचे असते किंवा रेस्टॉरंटमध्ये जायचे असते. सकाळी जॉगिंग करणारा एखादा प्रवासी संध्याकाळी मात्र प्रवासाच्या वेळी व्हीलचेअरची मागणी करतो. व्हीलचेअरवरील प्रवाशाला सर्वच ठिकाणी म्हणजेच विमानात चढताना, इमिग्रेशन खिडकीजवळ प्राथमिकता मिळते, हे त्यामागचे कारण असते. असा गैरवापर होता कामा नये.

या बाबतीत ज्या गाईडलाइन्स आहेत त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी. या सेवा नेमक्या कोणी द्याव्या हे ठरवले गेले पाहिजे. दिव्यांगांसाठी विशेष खिडकी असावी. त्यावर सेवा देणारा स्वतः दिव्यांग असावा त्यामळे दिव्यांगांसाठी आपोआप अधिक नोकऱ्या निर्माण होतील. आधुनिक टेक्नॉलॉजी उदा. AI आणि ॲप यांचा अधिक वापर व्हावा. बोर्डिंगपासून बाहेर पडेपर्यंत त्यांना काही हवे आहे का, याकडे लक्ष दिले जावे. तिकीट बुकिंग करतानाच काही विशिष्ट सेवा हवी आहे का, हे समजून घेतले जावे. प्रत्येक एअर लाइनने त्यांच्याकडे आलेल्या तक्रारी DGCA कडे पाठवाव्यात. त्यानुसार गाईडलाइन्समध्ये काही बदल करता येतील.

लंडन येथील हीथ्रो एअरपोर्टवर चेक इनपासून विमानात स्थानापन्न होईपर्यंत सर्व काम एक स्वतंत्र कंपनी करते. ही एक चांगली व्यवस्था आहे. त्याचाही अभ्यास व्हावा.

आदर्श एअरपोर्ट कसा असावा किंवा विमान कंपन्यांनी काय आणि कधी सोयी पुरवाव्यात यासंबंधी अटी किंवा सूचना तयार कराव्यात. फक्त विमान प्रवासादरम्यानच नाही तर रेल्वे स्टेशन, बस डेपो इत्यादी ठिकाणीही सर्व सोयी उपलब्ध व्हाव्यात. जागतिक पातळीवर उपलब्ध असणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध व्हाव्यात. अशा अनेक अपेक्षा पूर्ण होण्याच्या अपेक्षेत ग्राहक आहेत. ■


मुंबई ग्राहक पंचायत

mgpshikshan@gmail.com


## मणिपूरमध्ये ३ ख्रिस्ती धर्मगुरूंची हत्या

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

**इम्फाळ :** मणिपूरमधील कांगपोकपी जिल्ह्यात बुधवारी अज्ञात सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या भीषण गोळीबारात 'थाडू बॅप्टिस्ट असोसिएशन'च्या तीन ज्येष्ठ धर्मगुरूंचा मृत्यू झाला. या हल्ल्यात अन्य पाच जण गंभीर जखमी झाले असून, या घटनेमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. या घटनेच्या निषेधार्थ संतप्त नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २ वर दगड आणि लाकडे टाकून रस्ता रोखून धरला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्व धर्मगुरू चुराचंदपूर जिल्ह्यातील लमका येथे आयोजित एका परिषदेतून दोन गाड्यांमधून कांगपोकपीकडे परतत होते. वाटेत कोटजीम आणि कोटलिन दरम्यान दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्या वाहनांवर अंदाधुंद गोळीबार केला. या भीषण हल्ल्यात तिघांचा जागीच मृत्यू झाला.

## विश्वासदर्शक ठरावावरून अण्णाद्रमुकमध्ये दोन गट

### › सी.व्ही. षण्मुगम, वेल्लमणी यांच्यासह २९ नेत्यांची पक्षाकडून हकालपट्टी

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

**चेन्नई :** तामिळनाडूमध्ये चित्रपट अभिनेता विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) सरकारने विश्वासदर्शक ठराव जिंकला असला, तरी या ठरावामुळे प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या 'अण्णाद्रमुक'मध्ये उभी फूट पडली आहे. मुख्यमंत्री विजय यांच्या बाजूने मतदान करणाऱ्या सी.व्ही. षण्मुगम आणि एस.पी. वेल्लमणी यांच्यासह २९ बंडखोर नेत्यांना पक्षाचे सरचिटणीस एडप्पाडी के. पलानीस्वामी यांनी तातडीने पदावरून हटवून पक्षाबाहेरचा रस्ता दाखवला आहे.

बुधवारी विधानसभेत मुख्यमंत्री विजय यांच्या सरकारसाठी बहुमत चाचणी पार पडली. यावेळी पलानीस्वामी यांनी सर्व ४७ आमदारांना सरकारच्या विरोधात मतदान करण्याचा आदेश दिला होता. मात्र, एस.पी. वेल्लमणी यांच्या नेतृत्वाखालील एका गटाने उघडपणे बंडखोरी करत विजय यांच्या बाजूने मतदान करण्याची घोषणा केली. जनतेची इच्छा लक्षात घेऊन आम्ही या ठरावाचे समर्थन करत आहोत, असे वेल्लमणी यांनी सभागृहात स्पष्ट केले.

पक्षादेश झुगारून क्रॉस वोटिंग केल्यामुळे पलानीस्वामी यांनी मोठी कारवाई केली आहे. हकालपट्टी करण्यात आलेल्यांमध्ये १३ विद्यमान आमदारांचा समावेश आहे. सी.व्ही. षण्मुगम, एस.पी. वेल्लमणी यांच्यासह सी. विजयभास्कर, के.पी. अनबलगन, थंगमणी आणि आर. कामराज यांसारख्या दिग्गज नेत्यांची पक्षाच्या सर्व पदांवरून हकालपट्टी करण्यात आली आहे.

पलानीस्वामी यांनी सभागृहात गंभीर आरोप केले. आपल्या आमदारांना विजय यांच्या बाजूने मतदान करण्यासाठी रोख रक्कम आणि मंत्रिपदांचे आमिष दाखवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. अण्णाद्रमुकच्या तिकिटावर निवडून आलेले आमदार पक्षाशी गद्दारी करत आहेत, असे ते संतापून म्हणाले.

**विजय सरकारचे संख्याबळ भक्कम**

२३४ सदस्य असलेल्या तामिळनाडू विधानसभेत विजय यांच्या पक्षाने १०८ जागा जिंकल्या होत्या. बहुमतासाठी त्यांना ११८ मतांची गरज होती. मात्र, काँग्रेस, डावे पक्ष आणि अण्णाद्रमुकच्या २५ बंडखोर आमदारांच्या पाठिंब्यामुळे विजय यांनी १४४ मतांसह आरामात बहुमत सिद्ध केले. या फुटीमुळे अण्णाद्रमुकचे अस्तित्व धोक्यात आले असून, तामिळनाडूच्या राजकारणात आता नवीन समीकरणे आकाराला येत आहेत.

## काम न करणाऱ्या ठेकेदारांना नोटीस जारी

### › सिध्दार्थ गावस देसाई : दक्षिण गोवा जिल्हा पंचायत सदस्यांची बैठक

प्रतिनिधी । गोवन वार्ता

**मडगाव :** जिल्हा पंचायतीची मागील कार्यकाळातील मंजूर कामे, प्रलंबित कामे याची माहिती नव्या सदस्यांना दिलेली होती. त्यानुसार जिल्हा पंचायत सदस्यांनी पाहणी करुन जी कामे दीर्घ कालावधीपासून प्रलंबित आहेत, त्या ठेकेदारांना नोटीस काढण्यात यावी व काम केलेली नसल्यास काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी मागणी केली. त्यानुसार काही ठेकेदारांना नोटीस जारी करण्यात आलेली असून पुढील प्रक्रियाही सुरू असल्याची माहिती अध्यक्ष सिध्दार्थ गावस देसाई यांनी दिली.

दक्षिण गोवा जिल्हा पंचायतीची बैठक पंचायतीच्या सभागृहात बुधवारी अध्यक्ष सिध्दार्थ गावस देसाई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत पंचायत महिला शक्ती अभियानच्या प्रदेशाध्यक्षपदी डॉ. गौरी शिरोडकर, सचिवपदी पूनम सामंत, सहखजिनदारपदी आदिती गावडे, दक्षिण गोवा जिल्हाध्यक्षपदी राजश्री गावकर यासह अंजली वेळीप, मेलिफा कार्दोज यांचीही पदाधिकारीपदी निवड झाली. याबाबत दक्षिण गोवा जिल्हा पंचायत बैठकीत अभिनंदन करण्यात आले.

मोहन गावकर यांनी सांगितले की, जिल्हा पंचायत निधीअंतर्गत कामे केली जात असताना ठराविक रकमेपेक्षा कमीची कामे झाल्यास उर्वरित रक्कम दुसर्या कामांसाठी मिळावी.

मागील जिल्हा पंचायत सदस्यांकडून हाती घेतलेली, पण प्रलंबित असलेली कामे अजूनही सुरू झालेली नाहीत. काही ठेकेदारानी कामे सुरू केली असून आता स्थगित ठेवली आहेत. अशा ठेकेदारांना कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात येणार आहे. जर ठेकेदाराकडून काम केले जात नसल्यास ते काम रद्द करत पुन्हा नव्याने प्रक्रिया करुन कामांना चालना दिली जाणार आहे, असे गावस देसाई यांनी सांगितले.

एखाद्याचा मृत्यू झाल्यास अंत्यसंस्कारासाठी एसटी समाजबांधवांना २० हजारांची आर्थिक मदत मिळते. अशाप्रकारची मदत इतर सर्व समाजातील आर्थिक दुर्बल कुटुंबीयांना मिळावी, अशी मागणी जिल्हा पंचायत बैठकीत करण्यात आली. त्यानुसार समाजकल्याण खात्याकडे यासंदर्भात प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे व योजनेत सुधारणा करण्याची मागणी केली जाणार असल्याचे गावस देसाई यांनी सांगितले.



बैठकीला उपस्थित दक्षिण गोवा जिल्हा पंचायतीचे सदस्य.

**झेडपींना पार्किंगची जागा हवी!**

जिल्हा पंचायत सदस्यांना कोणत्याही कार्यालयात गेल्यास त्यांना वेगळी पार्किंगसाठी जागेची शोधाशोध करावी लागते. त्यामुळे महत्त्वाच्या कार्यालयाच्या पार्किंगमध्ये जिल्हा पंचायत सदस्यांसाठी जागा राखीव ठेवण्यात यावी किंवा वेगळ्या स्वरुपाचा स्टीकर गाडीवर लावण्यासाठी दिल्यास सरकारी जागेतील पार्किंगचा वापर करता येऊ शकेल, अशी मागणी सदस्यांनी केली. त्यानुसार पुढील पत्रव्यवहार केला जाणार आहे, असेही अध्यक्ष देसाई म्हणाले.


**punjab national bank** — Together for the better

**स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट शाखा, मुंबई**
पीएनबी प्रगती टॉवर, पहिला मजला, प्लॉट क्रमांक C-9, G-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई – 400051, ई-मेल: zs8356@pnb.co.in

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8(6) साठी प्रोव्हिसा सह वाचण्यात येणाऱ्या सेक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियली असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 नुसार अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

या सूचनेंतर्गत सर्वसामान्य जनतेला विशेषत: कर्जदार आणि हमीदारांना असे कळविण्यात येते की , खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सुरक्षित कर्जदात्याकडे तारण/हक्क म्हणून गहाण ठेवलेली आहे आणि ज्याचा रचनात्मक/प्रत्यक्ष/प्रतीकात्मक ताबा बँक/सुरक्षित कर्जदात्याच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतलेला आहे, ती मालमत्ता खाली दिलेल्या तक्त्यात नमूद केलेल्या तारखेला ""जसे आहे जेथे आहे" "जसे आहे जेथे आहे" आणि "जे आहे जे आहे" आणि "जे जे काही आहे ते" या आधारावर विक्रीस काढण्यात येणार आहे. ही विक्री संबंधित कर्जदार आणि हमीदार यांनी बँक/सुरक्षित कर्जदात्याकडे बाकी असलेल्या देयकांची वसुली करण्यासाठी करण्यात येणार आहे. प्रत्येक संबंधित मालमत्तेसाठी राखीव किंमत आणि अनामत रक्कम खाली दिलेल्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल.

**सुरक्षित मालमत्तेची अनुसूची**

| अनु. क्र. | शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार/हमीदार यांच्या खात्याचे नाव आणि पत्ता: | गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन / मालकाचे नाव (मालमत्तेचे गहाणखतदार) | अ) सरफेसी कायदा 2002 च्या कलम 13(2) नुसार मागणी नोटीशची तारीख ब) 30.06.2025 प्रमाणे थकबाकी रक्कम क) सरफेसी कायदा 2002 च्या कलम 13(4) नुसार ताबा घेण्याची तारीख ड) ताब्याचा प्रकार: प्रतीकात्मक / भौतिक / रचनात्मक | अ) राखीव किंमत ब) अनामत रक्कम क) बोली वाढ रक्कम | ई-लिलावाची तारीख आणि वेळ | सुरक्षित कर्जदारांना माहित असलेल्या बंधनांची/ खर्चांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एसएएमबी, मुंबई<br>**मेसर्स सुविकास अलॉय ॲण्ड स्टील प्रा. लि.**<br>**उप अधिकृत लिक्विडेटर,**<br>**मेसर्स सुविकास अलॉय ॲण्ड स्टील प्रा. लि. (लिक्विडेशनमध्ये),** अधिकृत लिक्विडेटर यांचे कार्यालय, उच्च न्यायालय, मुंबई, 5 वा मजला, बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई – 400 601.<br>**श्री. जगदीश प्रसाद अगरवाल** – 104, गणात्रा इंडस्ट्रियल इस्टेट, एसबीआय समोर, खोपट, ठाणे (पश्चिम) – 400 601.<br>**श्री. अनिल अगरवाल** – 104, गणात्रा इंडस्ट्रियल इस्टेट, एसबीआय समोर, खोपट, ठाणे (पश्चिम) – 400 601.<br>**श्रीमती. अंजूदेवी अगरवाल** – 104, गणात्रा इंडस्ट्रियल इस्टेट, एसबीआय समोर, खोपट, ठाणे (पश्चिम) – 400 601.<br>**श्री. नरेंद्र अगरवाल** – 104, गणात्रा इंडस्ट्रियल इस्टेट, एसबीआय समोर, खोपट, ठाणे (पश्चिम) – 400 601.<br>**श्रीमती. मुन्नी देवी अगरवाल** – 104, गणात्रा इंडस्ट्रियल इस्टेट, एसबीआय समोर, खोपट, ठाणे (पश्चिम) – 400 601.<br>**मेसर्स श्री श्याम स्टील** –26, कार्नेक सायडिंग रोड, रूम क्र. 9, शुगर मार्केट, मुंबई – 400 009.<br>**श्री. गुमानसिंग राजपुरोहित** –204, मातृ आशिष, अजय नगर, दुसरा मजला, भिवंडी, जि. ठाणे – 421308.<br>**मेसर्स सिधी इंडस्ट्रीज** –प्लॉट क्र. 21, मसात इंडस्ट्रियल इस्टेट, टिपको इंडस्ट्रीज जवळ, गाव मसात, वाया सिल्वासा, केंद्रशासित प्रदेश दादरा आणि नगर हवेली – 396 230. | स्वतंत्रपथ, वास्को द गामा, ता. मुरगाव, जि. दक्षिण गोवा येथे असलेल्या "वास्को सिटीसेंटर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि." या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील ऑफिस क्र. S-8, S-9 व S-10, एकूण सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ 83 चौ. मी. मालक : एम/एस श्री श्याम स्टील्स. | अ) 19.04.2012<br>ब) रु.26.84 कोटी + एनपीए तारखेपासून पुढील व्याज व शुल्क – प्राप्त रक्कम वजा, असल्यास<br>क) 21.03.2018<br>ड) भौतिक ताबा | अ) रु. 41,00,000/-<br>ब) रु. 4,10,000/-<br>क) रु. 25,000/- | 30/05/2026 सकाळी 11 ते दुपारी 4 | माहीत नाही |

**अटी आणि शर्ती**

सेक्युरिटी इंटरेस्ट (एनिफोर्समेंट) रूल्स2002 मध्ये निर्दिष्ट अटी व शर्ती तसेच खालील अटींच्या अधीन राहील:

1. सदर मालमत्ता "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जी आहे" आणि "जे जे काही आहे ते" या आधारावर विक्रीस काढली जात आहे.
2. वरील अनुसूचीत नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीच्या सर्वोत्तम आधारावर दिला आहे; परंतु अधिकृत अधिकारी या घोषणेमध्ये कोणतीही त्रुटी, चुकीची माहिती किंवा चूक याबाबत उत्तरदायी राहणार नाही.
3. विक्री खालील संकेतस्थळावर ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे केली जाईल: https://baanknet.com
   तारीख: 30/05/2026 वेळ: सकाळी 11 ते दुपारी 4
4. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी कृपया पहा: https://baanknet.com आणि www.pnbindia.in

**दिनांकित:** 13/05/2026
**ठिकाण: गोवा**

सरफेसी कायदा, 2002 च्या नियम 8(6) अंतर्गत वैधानिक विक्री सूचना

सही/-
अधिकृत अधिकारी
पंजाब नॅशनल बँक
सुरक्षित कर्जदार


## 'ओबेन'ची 'रॉर ईव्हीओ' लॉंच

**नवी दिल्ली :** ओबेन इलेक्ट्रिक या भारतातील संशोधन व विकास आधारित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनीने आज पहिल्या १०,००० ग्राहकांसाठी ९९,९९९ रुपये (एक्स-शोरूम) या विशेष सुरुवातीच्या किमतीत संपूर्णपणे नवीन 'रॉर ईव्हीओ'च्या लॉंचची घोषणा केली.

या श्रेणीमध्ये स्पष्ट बदल घडवून आणण्यासाठी डिझाइन केलेल्या 'रॉर ईव्हीओ'मध्ये डिझाइन, परफॉर्मन्स आणि कार्यक्षमतेचे संयोजन आहे, ज्यामुळे रायडर्सना इलेक्ट्रिक मोटरसायकलकडून असलेल्या अपेक्षांना नव्या उंचीवर नेण्यात आले आहे.रायडर्सना रोमांच आणि व्यावहारिकता यांपैकी एकाची निवड करावी लागू नये, या संकल्पनेवर आधारित 'रॉर ईव्हीओ' निर्मिती करण्यात आली आहे.

रिअल-वर्ल्ड प्रवासासाठी ही एक संपूर्ण आणि तडजोड न करणारी मोटरसायकल म्हणून डिझाइन करण्यात आली आहे. यात आक्रमक स्ट्रीटफायटर डिझाइनसह दमदार परफॉर्मन्स आणि विचारपूर्वक समाविष्ट केलेली वैशिष्ट्ये आहेत, जी राइड करताना जितका आनंद देतात तितकीच दैनंदिन वापरासाठी सुलभ देखील आहेत.

## भोंदूबाबा खरात प्रकरणी रुपाली चाकणकरांना 'ईडी'चे समन्स

### › ७० कोटींच्या व्यवहारांची होणार चौकशी

न्यूज डेस्क । गोवन वार्ता

**मुंबई :** भोंदूबाबा अशोक खरात याच्या वादग्रस्त व्यवहार प्रकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. या प्रकरणातील कथित मनी लॉंड्रिंगचा तपास करणाऱ्या अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आता थेट चाकणकर यांना समन्स बजावले असून चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

अशोक खरात याच्या 'शिवनिका ट्रस्ट'मधील संशयास्पद आर्थिक व्यवहारांची चौकशी ईडीकडून सुरू आहे. रुपाली चाकणकर या या ट्रस्टवर विश्वस्त म्हणून कार्यरत होत्या. या ट्रस्टमधील आर्थिक व्यवहार, निधीची झालेली देवाणघेवाण आणि या प्रक्रियेत पदाचा काही गैरवापर झाला आहे का, या दिशेने तपास यंत्रणेचा तपास सुरू आहे.

अशोक खरातवर खंडणीचे रॅकेट चालवून बेनामी बँक खात्यांच्या माध्यमातून ७० कोटी रुपयांहून अधिक रक्कम वळवल्याचा गंभीर आरोप आहे.

**तपासाचा फास आवळला**

याच प्रकरणात सीबीआयने (सीबीआय) चाकणकर यांची सुमारे पाच तास कसून चौकशी केली होती. सीबीआयनंतर आता ईडीने या प्रकरणात उडी घेतल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. या घडामोडींमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, येत्या काळात चाकणकर यांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पुढील काही दिवसांत होणाऱ्या या चौकशीतून कोणते मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

## 'फोनपे'ने साध्य केला ५कोटी नोंदणीकृत व्यापाऱ्यांचा टप्पा

**मुंबई :** व्यापाऱ्यांच्या पेमेंटच्या गरजा पूर्ण करण्यापासून ते त्यांना संपूर्ण फायनान्शिअल सोल्यूशन्स उपलब्ध करेपर्यंत वाटचाल फोनपेने केली आहे. भारतातील ९८ टक्क्यांहून अधिक पिनकोड्सपर्यंत व्याप्ती वाढवत शेवटच्या टप्प्यापर्यंत आर्थिक समावेशनाला चालना दिली आहे. २८ एप्रिलपर्यंत फोनपेच्या प्लॅटफॉर्मवर आतापर्यंत एकूण ५ कोटी नोंदणीकृत व्यापाऱ्यांचा टप्पा पार झाल्याचे फोनपेने जाहीर केले आहे.

## 'टोईंग' जेवणाचे ॲप गोव्यात उपलब्ध

**मुंबई :** टोईंग या परवडणाऱ्या फूड डिलिव्हरी ॲपने गोव्यात आपल्या सेवेचा शुभारंभ केल्याचे जाहीर केले. गेल्या ७ हून अधिक महिन्यांत, टोईंगने भारतातील ३५ शहरांमध्ये आपले जाळे विस्तारले आहे आणि हे ॲप खाद्यपदार्थ/पेयांच्या सर्वांत कमी किमतींचे आश्वासन देते. तसेच उपाहारगृहातील प्रत्यक्ष मेनू कार्डच्या किमती इतकीच किंमत किंवा त्यापेक्षाही कमी किंमत देण्याची खात्री देते. टोईंगवर दिलेल्या ऑर्डरवर पॅकेजिंग शुल्क किंवा प्लॅटफॉर्म फी आकारली जात नाही.